माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती मिळण्यासाठी अर्ज

प्रती

जन माहिती अधिकारी

कार्यालयाचे नाव व पत्ता ------------------------------------------------

१) अर्जदाराचे नाव - ---------------------------------------------------

२) अर्जदाराचा पत्ता व संपर्क क्रमांक -----------------------------------

३) हव्या असलेल्या माहितीचा तपशील

अ) माहितीचा विषय - आपल्या कार्यालयाच्या परिसरामध्ये लावलेले फलक

आ) माहितीचा कालावधी – फलक लावल्याच्या दिनांकापासून ते या अर्जाच्या दिनांक्रापर्यंत

इ) हव्या असलेल्या माहितीचे वर्णन-

आपल्या कार्यालयाच्या दर्शनी भागात व परिसरामध्ये सरकारी कर्मचारी व लोकसेवका विरुद्ध केले जाणारे अपराध व त्याबाबत भारतीय दंड संहितेमधील दंडनीय तरतुदी दर्शविणारे फलक लावलेले आहेत. त्यासंदर्भात खालील माहिती पुरविण्यात यावी

१. हे फलक लावण्याबाबत शासनाने काही शासन निर्णय, परिपत्रक, आदेश अथवा बैठकीचे इतिवृत प्रसारित केले असल्यास त्याची प्रत.

२. हे फलक कोणाच्या आदेशाने व कोणत्या तारखेस लावले ती तारीख व आदेशाची प्रत व त्याबाबत ज्या नोंदवहीमध्ये , पत्रात, अहवालात नोंद केली असेल त्याची प्रत .

३. हे फलक तयार करून लावण्यासाठी झालेला खर्च दर्शविणारे कागदपत्र उदा. त्यासाठी मंजूर केलेली टिपणी, कोटेशन मागवले असल्यास त्याचा तुलनात्मक तक्ता, प्रत्यक्ष दिलेले बिल , त्याची पावती व रोख नोंदवहीमध्ये (Cash Book) या खर्चाची केलेली नोंद या सर्वांच्या प्रती.

४. हे फलक लावल्यापासून आज अखेर त्यात नमूद केलेले काही अपराध आपले कार्यालयात घडले असतील तर त्याबाबत एफ. आय. आर ,पोलिसाना दिलेले पत्र इत्यादीच्या प्रती

५. या फलकांच्या बाबत्तीत उपलब्ध असलेल्या सर्व प्रकारच्या माहितीच्या प्रती .

४) माहिती टपालाद्वारे हवी कि व्यक्तिशः ---------------------

५)टपालद्वारे हवी असल्यास -

(सर्वसाधारण, नोंदणीकृत की शीघ्र)

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे किंवा कसे -

ठिकाण - अर्जदाराची सही

दिनांक -